# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला**



पुणे, मंगळवार
२३ जानेवारी २०१८

# राजगुरुनगर येथे शुक्रवारपासून बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

राजगुरुनगर : प्रतिनिधी

पुणे, मंगळवार, दि. २३ जानेवारी २०१८

# साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला २६ पासून

लोकमत न्यूज नेटवर्क

दावडी : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात दि. २६ जानेवारी ते १ फेब्रुवारीदरम्यान साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी दिली.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष रामसाहेब ठाकलकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर उपस्थित होते. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आयोजनामुळे संपूर्ण महाराष्ट्रात नावाजलेली ही व्याख्यानमाला सकाळच्या सत्रात होत आहे. व्यासपीठावर फक्त वक्ता आणि समोर ७ हजारांवर विद्यार्थी व ग्रामस्थांची उपस्थिती हे या व्याख्यानमालेचे ठळक वैशिष्ट्य. महाविद्यालयाच्या प्रांगणात दररोज सकाळी १० ते ११.३० या वेळात ही सर्व व्याख्याने होणार आहेत. व्याख्यानमालेचे हे १७ वे वर्ष आहे.

२६ जानेवारी रोजी इतिहास संशोधक प्रा. श्रीमंत कोकाटे हे 'श्री शिवछत्रपती : युगप्रवर्तक राजे' या विषयावर आपले मौलिक विचार मांडणार आहेत. २७ जानेवारीला अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. धम्मपाल भामरे हे 'शारीरिक, मानसिक तंदुरुस्ती आणि विद्यार्थ्यांची क्षितिजे' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

२८ जानेवारीला डी.आर.डी.ओ.चे शास्त्रज्ञ प्रा. काशिनाथ देवधर हे 'भारताची संरक्षण सिद्धता' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. २९ जानेवारीला भाल विकास गुपचे अध्यक्ष हनुमंतराव गायकवाड हे 'बी.व्ही.जी. एक प्रवास' या विषयावर आपले स्वानुभवपर प्रेरणादायी विचार मांडणार आहेत.

३० जानेवारी रोजी प्रसिद्ध संगीतकार व गायक डॉ. सलील कुलकर्णी हे 'कवितेचं गाणं होताना' या विषयावर 'कविता आणि सिद्ध झालेलं गाणं' यामधला प्रवास उलगडून दाखविणार आहेत.

३१ जानेवारीला आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. ज्याराम तोडकर हे 'औषधाविना आरोग्य' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. १ फेब्रुवारीला शेवटचे पुष्प पत्रकारकार व विख्यात दिग्दर्शक प्रवीण तरडे हे 'सोशल मीडिया आणि युवक' या विषयावर गुंफणार आहेत.

केसरी पुणे, २४ जानेवारी २०१८

# साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

राजगुरुनगर, (वार्ताहर) : येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचालित हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात दि. २६ जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी दिली. व्याख्यानमालेचे हे १७ वे वर्ष असून संपूर्ण महाराष्ट्रात नावाजलेली ही व्याख्यानमाला सकाळच्या सत्रात होत असून व्यासपीठावर फक्त वक्ता आणि समोर सात हजारांच्यावर विद्यार्थी व ग्रामस्थांची उपस्थिती हे या व्याख्यानमालेचे ठळक वैशिष्ट्य आहे. तालुक्यातील सर्व नागरिकांनी, माजी विद्यार्थ्यांनी व्याख्यानमालेत सहभाग घेऊन लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील व व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल कुलकर्णी यांनी केले आहे.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख